# उत्तररात्र

९५५५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. 9329

REFBK-0008728
REFBK-0008728

त्र्यं. वि. सरदेशमुख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम १९५०३ वि:
क्रमांक ७३२९ नों: दि: ८.३.५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम १८८०३ वि: ३/०५
क्रमांक १३२१ नों: दि: २८/३/५८

# उत्तररात्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ९८८०३ वि: काव्य
क्रमांक ९३२९ नों: दि २०।३।८
REFBK-0008728
REFBK-0008728
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
धा. क्र. ८७२८

त्र्यं. वि. सरदेशमुख

मित्र प्रकाशन : १

प्रकाशक :

त्र्यं. वि. सरदेशमुख
१७१८, नवी पेठ,
सोलापूर.

सर्व हक्क
प्रकाशकाच्या स्वाधीन.

• •

मुद्रक :

रमण गांधी
कल्पकला प्रिंटिंग प्रेस
६४८, फलटण गल्ली,
सोलापूर.

प्रथमावृत्ति :
डिसेंबर १९५५

• •

किंमत दोन रुपये

थोरली आई
आणि
कमाताई
यांच्या स्मृतीस

• •

कवितांचा हा संग्रह माझ्या मित्रांचाच. त्यांनीं काय एवढें मनावर घेतलें, मला अजून पुरें कळलें नाही. त्यांच्यापैकीं कोणाचे आभार आवर्जून नांव घेऊन मानावे आणि कोणाला वगळावें? त्यांतहि श्री. श्रीराम पुजारी व श्री. रा. वा. शिरोळकर यांना मीं अशीतशी खूपच तसदी दिली. श्री. ना. सी जोशी व श्री. माधवराव देशक हे या प्रकाशनाच्या उपक्रमाचे आरंभापासून साहाय्यक. प्रोत्साहक सगळेच. त्यांच्या सौहार्दानें मला ऋणी केलें आहे.

श्री. रमण गांधी यांनीं छपाईबाबत अतिशय आपुलकीनें श्रम घेतले. त्यांचा मी आभारी आहें.

यांतील कांही कविता मागें 'अभिरुचि' 'साहित्य' व 'अंजलि' या नियतकालिकांतून 'वैशाख' या नांवाखाली प्रसिद्ध झाल्या. परवा 'सत्यकथे'नें चार कविता एकदम प्रसिद्ध केल्या. या सर्व संपादकांचा मी आभारी आहें.

मार्गशीर्ष १८७७,
सोलापूर.

त्र्यं. वि. सरदेशमुख

# अनुक्रम


| | |
|---|---|
| आभास | १ |
| शाप | २ |
| कानोसा | ४ |
| इतिश्री | ७ |
| स्वप्नपाखरें | १० |
| लपंडाव | १२ |
| कधि न्हाला नाहिस | १४ |
| भर दिवसा | १६ |
| मार्गशीर्षांतल्या पूर्वरात्रीं | १७ |
| निरोप | २० |
| आम्ही | २२ |
| कालिंदीतीरावर | २५ |
| पर्जन्यधारा | २७ |
| पहाट | ३१ |
| तळमळ | ३४ |
| वाट चुकुन | ३५ |

| | |
|---|---|
| भरवसा | ३७ |
| तृष्णेच्या कांठावर | ४० |
| सूत्रधार | ४३ |
| नवल वर्तलें | ४७ |
| नीरानरसिंह | ४९ |
| कसलें गाणें ? | ५२ |
| वाटतें विचारावें | ५४ |
| रूप पाहतां दर्पणीं | ५८ |
| तूं | ६३ |
| मी | ६४ |
| हेंचि दान दे गा | ६६ |
| आठवण | ७१ |
| निवान्त | ७३ |
| असशील कुठे ? | ७५ |
| अजून इथे | ७७ |
| राजहंसांनो | ७९ |
| जाग | ८४ |

• • •

The pain of life, that haunts our narrow way,
I cannot shed with this or that attire.
Too old am I to be content with play,
Too young to live untroubled by desire.

...When soft night has shrouded all the west,
My anxious soul will beg her peace supreme;
But still I lie forsaken, for my rest
Is shattered by the wildness that I dream.

= Goethe

अनुक्रम ९८५०३ वि.
क्रमांक ९३२९ नोंः दि:

# आभास

बाजूस, पाठिशी, समोर डोंगर–रांगा
डोईवर भुरट्या निळ्या नभाची आभा
त्या धुक्यापलिकडे दिसतां कुणितरि घालीं–
साद मी : डोंगरा वाचा फुटली नाही.

'नंदलाल तूं, मी तुझी लाडकी राधा
घे कमळपाकळ्या नवतीच्या चुंबाया
येईन पहाटे यौवनयमुनेकांठीं . . .'
ती पहाट कांही आलि न रात्रीपाठीं !

दा. क. 6626

# शाप

प्रदेशांत स्वप्नांच्या
द्राक्षमळा शिंपितसें

चुटपुटत्या जाणिवेस
लाव्हारस झोंबतसे.

चंद्राच्या कवडशांत
चुंबितसें कुसुमदळें

चंद्राच्या कोळशांत
गारठतीं मधुर पळें.

रागांच्या प्रणयांतुन
आळवितों मदन-दीप

भोगांच्या नौकेंतुन
गाठतसें यमद्वीप.

रंगमंदिरीं सुसज्ज
रूपयज्ञ   नटवाया
दंग जीवनीं विलज्ज
असुर-भाव पटवाया.

कर्माच्या संगरांत
छेदितसें अहं–मर्म
ग्लानीच्या   कर्दमांत
रुततें परि धर्मचक्र !

# कानोसा

श्रावणांतली दुपार :
क्षितिजापर्यंत आज
पाउस तगमगुन उठे.

गांवाबाहेर दूर
खोल निळें एक तळें
फुलति ज्यांत कमळकळे.

त्याकांठीं चिंचेचें
कवठाचें, वेळूचें
सुंद, गर्द बन झुलतें.

त्या बनीं शिवालयीं
पेंगुळल्या घंटेचा
नाद निवे एकांतीं.

कमळफूल, बेलदळें
वाहुनि मी परत फिरें—

वळणाच्या बांधावर
वाऱ्याचा ठाव चळे.
डोईवर धुसफुसता
पाउस मेघांत कुढे !

'मी येऊं ?'
'मी येऊं ?'
साद घुमे वेळुवनीं.
वेळावुन बघतांना
कुणि न दिसे, कुणि न पुसे.

कोठुनि हा तीर घुसे ?
न कळे हें काय पिसें !
कोण मला सांगाती
होउं बघे या विजनीं ?

हाक अशी कालविते
मोहविते, चळवीते.
वेळूचें बन झुलतें
खुणावीत चित्ताला...

...खुणावीत प्राचिनांत
नेतें मज द्वापरांत

मेघनील मूर्तीच्या
प्रेममयी संगतींत.
काळाच्या वाळूंतुन
ओघळुनी झिरपत ये
वेळूची शीळ मधुर–
स्फुरली जी देवकिच्या
पुत्राच्या ओठांवर !

'मी येऊं ? '
'कां न येसि ?
कानोसे कां घेसी ?
युगविरही व्याकुळ मन
प्रश्नांकित कां करिसी ?

प्रेमळास प्रीतीनें
राधिकेस कृष्णानें
विसरावें, ठकवावें
रीत सख्या ही कुठली ?'

# इतिश्री

अज्ञातवासांत माझें जिणें :
विजयोत्सवाचे सोडीत संकल्प
प्रियासंगमाचीं रचीत स्वप्नें
अज्ञातवासांत जगतों जिणें.

अग्निगर्भ वृक्षाच्या कोटरीं
त्या काळरात्रीं दडविलीं
त्रैलोक्य जिंकणारीं
अस्त्रें – शस्त्रें
ज्यांचा केला पवाडा गंधर्वांनीं !
वनवासांत संपादिले नवे लोभ
जोडिलीं नवीं सख्यें
आणि भोगिलीं दु:खें
अवमानित जीवनाचीं
पांगुळल्या वांछितांची :
त्यांतहि परि दाविली
मानवी तितिक्षेची आणि धीराची
परासीमा.

संयमाचें बांधिलें कंकण.
निग्रही तपाच्या आसनावरून
उल्लंघिले दुर्गम पहाड ज्ञानाचे.
घातले पालथे सप्तपाताळ
गूढविद्येचे.
नागकन्येस केलें विव्हल
हिसकिलें शिवाचें पाशुपतास्त्र !
उघडून स्वर्गाची वेस
प्राशिलें मंदाकिनीचें जीवनामृत
आणि अमरावतीचें चिरतरुण सौंदर्य.
रोमरोमीं साक्षात्कार
वीणापैंजणांच्या झंकाराचा !
अव्हेरिलें परि
उर्वशीचें निशानिमंत्रण !

आश्विन दशमीचें ठरलें पुण्याहवाचन :
त्या शुभदिनीं
होईन मुक्त या शापांतून, सोंगांतून
आणि गाईन भरतवाक्य
बृहन्नडेच्या नाटयरूपकाचें !
त्या शुभदिनीं–
अवतरेल माझ्या लोचनीं
आईच्या वदनींचा हेमंत–
करुण आशावंत...

जिच्या स्मृतीनें गाळिलीं आसवें
एका सूर्यास्तसमयीं
गंधमादनावरील चंदनवनांत !
...आणि संचरेल माझ्या बाहूंत
याज्ञसेनीच्या नयनींचा ग्रीष्म–
प्रखर, दाहक
जिचा होतां सुकुमार आठव
व्यथितान्तर झालों एका शारद रात्रीं
हरद्वारीं, गंगातीरीं !

ती करुणा, ती तेजस्विता
ती ममता, ती उग्रता
रक्षील जें रक्षायचें
जाळील जें जाळायचें.
आज परि अज्ञातवासाचें जिणें
छेडितें, डसतें
काळजाला ठायीं ठायीं :
धुमसती उच्चारलेल्या प्रतिज्ञा अंतर्यामीं.

सोडीत कडवे संकल्प
भवितव्याचीं रचीत स्वप्नें
आज चिंतितों इतिश्री
उद्वेगपर्वाची !

# स्वप्नपाखरें

आभाळ कोसळे, टळून गेली सांज
चौदिशां पिसाटापरी हुंदडे वारा
अस्मान गर्जतें, दुनिया भांबवलेली–
निमिषांत जाहलें पाणी-पाणी-पाणी.

उरफाटा ठिबके काळाकभिन्न डोह.

कोणी न जगामधि माझें, मी न कुणाचा :
कीं असेल कोणी? कदर परी कोणाला?
'वाऱ्यापरि यावें, जळापरी परतावें'–
खैयाम बोलला तेंच खरें का अंतीं?

अंगणीं थरारे तुळस, जाइची वेल
वळचणींत फडफड करि चिमणीचें पोर...

ये जाग. कशाचा चाळा चित्तीं सलें?
सारून जाळिचें वस्त्र दूर पाहिलें.
मध्यरात्र उलटे : गगन निथळुनी निवळे
विखुरलें चांदणें परागपांडुर निळें.

वाटलें, तुला या शांत समयिं भेटावें
हितगूज जिवाचें सांगावें–ऐकावें.

चांदण्यास पडलीं स्वप्नें तेव्हा, सखे,
स्फुरणाचे त्यांना तरल पंख मग फुटले
तीं भ्रांत पाखरें स्वैरपणें विहरण्या
आशेच्या नवल्या प्रांतीं सुदूर गेलीं...
गवसला न त्यांना कुठे उबारा अजुनी.

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत
अनुक्रम १८५०३ वि: ०२।४४
क्रमांक १३२१ नों: दि: २८।१।३

## लपंडाव

उधळुन पडलीं पश्चिमेस शत मेघांचीं शकलें
विदीर्ण त्यांच्या वस्तीआडुन सूर्यकिरण फाकले
सभोवार आकाशधरेच्या मीलनरेषेंत
तिरप्या उन्हांत हिरवीं रानें पेंगुळलीं शांत.
माळ-टेकडी-रान-तळ्याच्या प्रसन्न सान्निध्यांत
आणि सखे, तव चैतन्यमयी संगति-सौख्यांत
सुंदरतेच्या शिवतत्त्वाच्या भावपूजनाचे
तरंग माझ्या अंतरिं उठले :

होइल का सांगता ?

ती झाली तर भूतकालचें आणि भविष्याचें
उदक सोडण्या राजी, अर्पण आज मला व्हायचें.
बाळगिल्या मी आजवरी या उरांत मूक मनीषा
लुळ्या-अपंगांनाही फुटेल जीभ हीच आशा.
मुखरित झाल्या त्याच आजला, सखे, तुझ्यापुढती
उज्ज्वल झाल्या पुन्हा मनाच्या विझणाऱ्या ज्योती.

पाहतेस कां ? मुक्या लोचनीं लाघव कसलें भरे ?
क्षितिजाखाली जिरत चालले प्रकाशदायक झरे.

लपंडाव, गवसणें-हरपणें हीच आपुली कथा ?
आकाशाला लपेटुन बसे काळी विटकी कंथा.

जशा निपजल्या तशा निमाल्या अंतरिच्या ज्वाला
आणिक राही हातीं माझ्या अनाघ्रात माला.

# कधि न्हाला नाहिस

कधि न्हाला नाहिस प्रपातधारांखाली
कधि नाचलास का पाउस-गारांखाली ?

कधि प्याला नाहिस शहाळ्यांतलें पाणी
कधि शोधिलीस का करवंदांची जाळी ?
कधि शैलशिरांवरि सकाळसायंकाळ
निरखिलेस तेजोबिंबांचे उदयास्त ?

कधि पाहिलेंस का मोरांचें वनलास्य ?
अन् ऐकिलेंस का दरींतलें प्रतिहास्य ?
कधि हुंगिलास का रानफुलांचा ताफा ?
कधि तरंगलासी बांधुनि बांबु-तराफा ?

त्या भग्न तटांच्या अनंत सांदींतून
घुमतात पारवे, राघू, मैना, घूक.
कधि ऐकिलींस का हुरहुरल्या कानांनीं
कटु-मधुर सुरांचीं करुण-विदारक गाणीं ?

कधि चुंबिलेस का प्राजक्ताचे देठ ?
निववि‌लेस कधि रे विलासिनीचे ओठ ?

कधि भरला नाहिस भरभर शराब-प्याला
कीं उठे तरारुन जयांत तेजोमाला–
स्फुरणाची ! जो तूं लवभर तरि प्राशून
कधि गेला नाहिस मनःपूत बरळून !

पाठीवर चढली जुनाट अवजड गोणी
ही झापड कसली डोळ्यांवरती दोनी ?
पायांत कशाला लंगर अडकविलेस ?
कां मानसनौका संतत नांगरलीस ?

# भर दिवसा

घुसळुनी अंगभर होउनिया हैराण
खांद्यावर माझ्या टाकुनि देई मान.
कवटाळुनि धरिली रानवेल छातीशी
तों कळचा उमलल्या रोमारोमांतुनी.

उंचावति सागरिं शैलोत्तुंग तरंग
लांबल्या सावल्या, वाळवंट निःसंग !
पश्चिमेस झुकला चंद्र होउनी पिवळा–
कां हृदयीं भरल्या न कळे कातर कळा...

भर दिवसा असली प्रीत साचली नेत्रीं !
आहे का कोठें तें स्थल, ती मधुगात्री ?

# मार्गशीर्षांतल्या पूर्वरात्रीं

मार्गशीर्षांतल्या पूर्वरात्रीं
क्षीण जलवाहिनीच्या तटाकीं
चिंचेतळीं आज होई सखे, भेट माझी-तुझी.

दूर डोंगर धुकें
शांत धूसर निळें,
माणसांचे थवे
रस्त्यांत, चौकांत घोंगावती.

मृगशीर्ष डोईवर
रोहिणी कृत्तिका :
मंगळाचा चढे लाल तारा.

उरांतला दाह
नेत्रांतली आस
ओठांतली प्यास निःशब्दवीते.

यौवनाचा ग्रंथ
असमाप्त राही
जीवनाचा छंद
हृदयांत, कंठांत अपुराच विव्हळे.

यौवनाची तृषा
आटून गेली
यौवनाची निशा
इंद्रजालापरी फाटून गेली.

अशा भग्न वेळीं
उद्विग्न भ्रांतींत
हिंदोळणाऱ्या
चित्तास, सखये, तूं जागवीलें.

अनुरक्त वाणींत
आसक्त अश्रूंत
मज लाभली
दीप्ति, संजीवनी :
अनपेक्ष वर्षाव ओथंबला.

उजळून गेला
न्हाऊन गेला
माझिया दिलाचा शाही मिनार.

अखेर झाली...
वेगळाल्या दिशां
गेलों दुभंगून
कमनीय चाहूल–
छाया तुझी राहि माझ्यासवें.

मार्गशीर्षातल्या पूर्वरात्रीं
चिंचेतळीं, वाहिनीच्या तटीं
चंद्रप्रकाशांत झाली सखे, भेट माझी-तुझी.

# निरोप

सोन्याचे दिन भाळीं तुझिया भविष्यांत असतां
इथे सखि, कशास गुंतसि अता ?

दृष्टिआडच्या फांदीवरुनी नकोस देऊं हाका
झालें-गेलें नको आठवूं दुबळ्या आणा-भाका.

तुझ्या दर्शनें सये, बहरलें स्नेहल सुखचांदणें
तुझ्या वैखरींतून ऐकिलें संजीवक गाणें
तुझ्या स्पर्शनें अभिलाषेला राजस दरवळ सुटे
वीतराग चित्तांत झगमगत दीपराग उजळे.

तूं जातां हें मधुर चांदणें मावळणार खरें
आणि मनाच्या घुमटामध्ये होइल ओस, सुनें
देखोदेखीं झडून पडतिल फुलवंतीचे तुरे
दीपमाळही तिनसांजेसच मालवणार सये.

झांजरवेळीं काजळरात्रीं एकलकोंड्या जिवा
उदासवाणा आणि दिवाणा करील सोबत दिवा

चित्ताच्या घरट्यांत कधिकधीं पडेल घडिभर तुझ्या–
सुकल्या स्मृतिचें मंद चांदणें, नकली केविलवाणें
कळवळेल अन् व्यर्थ माधवी उल्हासाचें गाणें :
जीवन माझें विवंचनेचें, याची कडवट कथा
इथे सखि, नकोस गुंतूं आता.

तूं जायाची वेळ ठेपली : रात्र चढे गगनीं
निरोप देणें-घेणें आतां संपलेंच सजणी
विषाद ठेवुनि माझ्यापाशीं हासत जा परती
इथे सखि फसूं नको पुरती.

दा. क्र. ८७२८

# आम्ही

ब्रिटिशांच्या राजवटीच्या अखेरीस बंगालांत दुष्काळ पडला आणि पुढे भारताच्या फाळणीच्या वेळीं माणसांची हत्या झाली.

सस्यशामला, सुजला, सुफला भूमीवरती या
नाटक भीषण छान रंगलें निरन्न मरणाचें !
सुहासिनी अन् मधुरभाषिणी भूमीवरती या
तांडवनर्तन छान नाचलें सूड-द्वेषाचें !

परलोकप्रस्थान मांडिलें सुकल्या जीवांनीं
बुभुक्षितांचा फन्ना केला सदय गिधाडांनीं.
थिजलीं रक्ताचीं थारोळीं; त्यांत चंद्र हिरवा
क्रूर, धुंद, लज्जास्पद वैभव दावित थरथरला !

दीनांच्या लाचार लक्तरांआड मुजोरीनें
मिरवत जातीं धन-मद-सत्ता-विलास यांचीं पापें
नृत्यमंदिरीं मद्यपिपासा झिंगुन चढलेली
समृद्ध माया स्वार्थी अन्नब्रह्माची नटलेली !

राजपथीं परि फरसबंदिवर चौकाचौकांतून
हाडांचे सापळे अचेतन पडले मुदडून.
नागवलेल्या कंगालांचें कण्हणें ऐकून
हिमालयाचें हास्य वरमलें, गंगाजल खिन्न !

⁂ ⁂

आम्हांला परि नसे कशाची क्षिती आणि गणती
स्थितप्रज्ञ लोचनीं आमुच्या निसंग ही उपरती.
आत्मतोष अंतरांत, दुनियेविषयीं निर्ममता
भरल्या कोठारांची भरल्या पोटांनीं चिंता !
सुवर्णभूमीमधे जन्मलों, सोन्याचे घास
खाण्याचा अधिकार कुणाचा ? अम्ही खानदान !
पडझडलेल्या खुराड्यांतले भिकारडे जीव
उकिरड्यावरी खुशाल चरती मातीचे घास...
प्राक्तन नादानांचें ! गेला मरून त्यांचा देव.
उपास पोटीं आठवड्यांचा, जन्मांतरिचें दैन्य
कपाळावरी, डोळां भरला अमुचा विद्वेष.

चूड लावुनी दिगंतराला रक्तदीप आगळे
दिवसाढवळ्या श्रीमंतीनें आम्ही पाजळले !
कोणी रातोरात बांधिली कबर राहत्या घरीं ?
उजाड निर्जन केलीं हातोहात नांदतीं खेडीं ?

'धर्मान्तर वा मृत्यु, नरक!' ही नवी निर्मुनी घडी
असंख्यात जीवांस लाविलें रेटुन देशोधडी!
हाकांनीं नभ भरलें कोणी फोडुन कांकणचुडे?
धरतीला कुणि न्हाउं घातलें फोडुन जीवन-घडे?

⁘ ⁘

सस्यश्यामला, सुजला, सुफला भूमीवरती या
नाटक भीषण छान रंगलें निरन्न मरणाचें!
सुहासिनी अन् मधुरभाषिणी भूमीवरती या
तांडवनर्तन छान नाचलें सूड-द्वेषाचें!

# कालिंदीतीरावर

फासे सगळे उलटे पडले.
पूर्वेस जळे हलकल्लोळ
माणुसकीवर निवे निखारा
प्रीतशांतिच्या थडग्यावरती
वेताळाचा झडे नगारा.

उरांत वाहत ओल्या जखमा
थिजल्या नेत्रीं मुरले अश्रू
भयाण आसुर चर्येखाली
खोल बुडालें मानवी हसूं.

विच्छेदाच्या, विध्वंसाच्या
गर्द दलदली रायांमधुनी
अभयसाद घालीत निघालें
त्या समयाला झालें वंचित
महोदार तें अंतःकरण.
त्या समयाला गेलें भंगुन
वसुंधरेचें जीवनदर्शन.

आज वेगळें काय वर्तलें ?
धारातीर्थी शरीर पडलें.
शिरीषसुम धरणीच्या कुशींत
मृत्युंजय होउनिया निजलें !

कालिंदीतीरावर झालें
त्या देहाचें अग्निसमर्पण.
मावळतीहुन सविता पाही
नव्या मनूंतिल एक संक्रमण.

पुण्यश्लोकांच्या रक्ताची
या पृथिवीला दैवी तृष्णा.
या थेंबांतुन याच भूमिवर
रुजून बीजें फळास येतिल
सौंदर्याच्या, आनंदाच्या
सत्यावरल्या धीट प्रीतिच्या
विराट बागा देवतरूंच्या.

# पर्जन्यधारा

कधी वरसतील, देवा,
तुमच्या दयेच्या करुण धारा ?

तडे जागोजाग धरणीला.
पाताळापर्यंत चरत चालल्या
चित्तविदारक खादाड भेगा !
होरपळून, भाजून गेलें जीवन.
एकही न उरला जिवंत आशेचा
झुळझुळता निर्मळ झरा.
रानोमाळ झळझळती
मृगजळाचे ओढे-नाले.
रस्तोरस्तीं साचला
ग्रीष्माचा गवतपाचोळा
उकिरडा, धुरोळा–
आणि घरोघरीं आढ्यास लटकलीं
वांझ वर्षास्वप्नांचीं कोळिष्टकें !

पुरें झालें आग पाखडणें !
तें अधर्म्य यज्ञकुंडें चेतवणें
आणि अमंगळ धुराच्या शेणानें
आभाळ सारवणें !
पुरे ती मुक्या दुर्बळांची मानकापणी
आणि तें जगत्क्रांतीस्तव पत्करलेलें
जगत्‌शांतीस्तव स्वीकारलेलें
तेजस्वी ठकांचें मतलबी पौरोहित्य.
उठवा ती आतां, देवा,
जगभर ऐसपैस बसलेली
दहनांची आणि दफनांची
अंगतपंगत.
होवो समाप्ती एकदा
अग्निपुराणाच्या भ्रांत आवर्तनांची !
कधी बरसणार यास्तव
तुमच्या दयेच्या करुण धारा ?

धनराशींवरील काळसर्पांचे उन्मत्त फूत्कार
अगणित उपाशी पोटांत
जागवीत आहेत सर्वभक्षक वणवा.
कांहीं उरांत धुमसतें अहोरात्र
द्वेषाचें अग्निहोत्र.
कोणाच्या हातीं जळफळतो
उग्र, बेशरम हिंसेचा हिलाल...

आणि इकडे अनघ नेत्रांत
युक्त कामनांची राख-राख !
शांतवाया रसातळा न्या हीं
सगळीं अभद्र अग्निसंतानें.

काहिलीनें सतत भंगणाऱ्या निद्रेत
निराशेच्या निसरडीवरून
कोलमडलेलीं,
भयानकांत डुचमळणारीं
मानवी जीवनाचीं स्वप्नें--
वेगानें धावडून न्या
साम्याधिष्ठित, सत्यशासित
आनंदमय गंधर्वद्वीपाच्या
स्वागतशील सीमेला.

कोसळो तुमच्या दयेची गंगा
या तृषार्त दग्धाश भूमीवरी.
सावळें रसगर्भ रूप तुमचें
देवा, अवतरो मेदिनीवरी.
फुलवा येथलीं ओसाड रानें
वाहूं द्या प्रीतीच्या अखंड सरिता
शुष्क स्तनांतून, देवा, झरूं द्या
नवजीवनार्थ अमृतपान्हा.

रात्रीच्या गडद काळोखांत
सौदामिनीचा शोधदीप घेऊन

घनगर्जितांचे देत इषारे
दशदिशांतून तुडवीत नाचत
येवो तुमची मायाळू संहारशक्ति.
एकाच रात्रींत होऊं द्या
अशिवाचा, असुंदराचा उच्छेद
निर्दालन दुर्मतीचें
बीमोड दुर्गतीचा
आणि नवनिर्मितीचें बीजक्षेपण !

दुसऱ्या प्रसन्न प्रात:काळीं...
कमळपाकळीपरीस मृदुल
सोमरसाहुन उत्तेजकशा
कोवळ्या, चैतन्यदायी उन्हाचें
भर्जरी आवरण घाला
वसुंधरेभोवती.

तुमच्या करुणाजळांत न्हालेल्या,
नव आशांचें लावण्य उरीं ल्यालेल्या
भवितव्याचा दैवी गर्भ जोपासणाऱ्या
चिरयौवना, विरहिणी पृथिवीस
बाहूंत घ्या–
आणि पुरवा
या आसावल्या सखीचीं मनोगतें.

वरसूं द्यात एकदा, देवा,
तुमच्या दयेच्या करुण धारा.

# पहाट

गगनांत चौताळुनी गर्जणारा
घोंगावणारा प्रहरांनिशी
मंदावला पूर्ण सोसाट वारा
मज येइना नीज तरिही कशी ?

कडाडुनि निमाल्या विजा दशदिशांना
परतून गेला पाऊसही
स्मित चांदण्यांचें कोमेजलें, परि
मज येइना नीज अजुनी कशी ?

अवकाशाच्या ओसाडीमधि
भयाण, निःस्वन झालें आतां
भावप्रलयानंतरची का
नांदतसे सामसूम भेदक ?

अंतराळिचा प्रेमळ, शीतल
संमोहक, संजीवक वारा
कुणी रोधिला, कुणी कोंडिला ?
कुठे बंदिवान झाला न कळे.

माझा दुबळा, गुदमरलेला
बावरलेला, धडपडणारा
अंधारांतुनि उजळतीकडे
चोरपावलीं निघे श्वास हा.

घरट्यामधि कोठून निवारा
मिळेल असल्या भीषण रात्रीं ?
सभोवतालीं निपटुन जाउन
ओलें, उजाड रान पसरलें.

काळवंडला जीवनदरिया
लोपुन गेली क्षितिजकडा, तरि
बंदरांतला नांगर तोडुन
गलबत कोण्या दिशे निघालें ?

कोणास कळे रात्र उरे किति ?
कुठे किनारा, कुठे आसरा ?
कुणा उमगली जीवनसीमा
कुठे मुरडते, कुठे संपते ?

वादळवाऱ्याची तर कधीच
नाही धरिली हळवी मुर्वत
अंतरांत परि वांछित आहें
पहाट उल्हासाची मंगल.

यमदिशेस हा अगस्ति चमके...

कुणा सखीची हाक सख्याची
प्रकाशकिरणीं न्हाउन येइल
आणि मूर्च्छना विश्वामधली
दिगन्त काळें करून जाइल !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम १९८०३ वि: ७१८४
क्रमांक ... १३२१ ... नों: दि: २०।३।७४

# तळमळ

कांट्यांचा किरिट भाळि
रुतलेला, खुपलेला.
मस्तवालपण माझें
कीं असल्या कुदशेंतहि
सेवेचीं, स्नेहाचीं
सख्याचीं, प्रीतीचीं
रम्य रात्रि, उजळ उषा
यांचीं नित जागवितों
मुसमुसणारीं स्वप्नें !

कानशिलें रक्तानें
थबथबलीं असतांही
डोळ्यांच्या पाणथळीं
बिंबतात स्वप्नें हीं–
जीवनार्थ तळमळ ही !

# वाट चुकुन

वाट चुकुन आडवाट कशाला झालिस मैतरणी ?
वेळ सांजची माझ्या दारीं आज दिवेलागणी !
आभाळाला फुटलं हासू, धरतीला रोमांच झोंबला
नवलस्पर्श उंबरठ्याचा ताठा रोडावला !
संग-मनीषा तुवां दावितां आज अशी जिवलगे,
फटकळ मुलुखाचें कवाड, परि अळीमिळी बसलें !

वाट चुकुन आडवाट कशाला आलिस आज सखे ?
जाईचा पांघरून शेला उतरे ग चांदणें !
मंथर डोळ्यांमधे हासते खुणावणी प्रीतिची
पिकल्या ओठीं अंगतपंगत कीं ग मदनरतीची
अंगभरी लावण्य लवथवे जळांत जणु मासळी
इथे झाकशी, तिथे झाकशी, ठसलें डोळांभरी !

अशी कशी होईल साजणी सुटका आज तुझी ?
नवसा-सायासाचं रहस्य ऐकशील तरी कधी ?

मुकेपणानं किती ग छळावं आणि झुरावं उगी ?
झरझर पांगे वसंतवारा परतणार का कधी ?
दिठींत पाहूं अर्धी तृप्ती अधीर आणिक कष्टी
मिठींत बोलूं विलग व्हायच्या अवघड गुजगोष्टी !

वाट चुकुन आडवाट कशाला झालीस मैतरणी ?
कातर वेळीं काजळनयनीं केलिस ग करणी !

# भरवसा

आज कुठें ती तुझी विव्हलता ?

त्या दिवसांमधि, त्या रात्रींतुनि
चिंतिलीस तूं माझी प्रतिमा
आणिक भुरट्या सायंकाळीं
अर्ध्यामिटल्या भरल्या नयनीं
कुरवळलिस तूं माझी काया.
एक काळच्या आर्त प्रणयिनि
आज कुठे ती तुझी विव्हलता ?

दिलींस आणिक घेतलींसही
निकट मिठीनें धुंद चुंबनें
नाशवंत त्या अनुरागानें
व्यर्थ लाविली ओढ सुखाची.
ओठांवरची सुकली मुद्रा
रोमांचांचा कंप विरमला
डोळ्यांमधल्या रूपनगरच्या
खुणा दिसंदिस बुजत चालल्या...

परंतु तुजला काय तयाचें ?
तूं तर कधीच पाठ फिरविली !

मागे वळुनी पाहिली न तूं
धैर्याची ती अपूर्व तगमग.
पायदळीं ठिबकतां आसवें
लोटून दिली त्यावर माती
निर्धारानें हासत हसवित.
सद्गद होतें, उदास होतें
कधी कधी मन व्याकुळ होतें...
तुझ्या अंतरीं कधि उठते का
हीच वेदना, स्मरणा-यातना ?

प्रीतीचें सौभाग्य कपाळीं
नाही अपुल्या या जन्मीं तरि :
नसो. शिकंदर नशिब एवढें
कीं प्रीतीच्या उदारतेचें
ऐश्वर्याचें, सामर्थ्याचें
ओझरतें तरि घडे सुदर्शन !

जन्मतुटी थोडीच आजला ?
अगणित जन्मांतून यापुढे
नानाविध नामरूप लेउन
निर्मल जिवंत भावबळानें

शोधित जाइन चित्तसागरीं
स्फटिकजळाचा पैल किनारा.
तिथे प्रेमळा विशाल मधुरा
तुझी आकृती असेल भारून
मातीला, मेघांना, पशुंना
वृक्षवेलिंना, जळलहरींना...

आज वाटतो मला भरवसा—
निवल्यावाचुन मरणार न ही
जन्मांतरिची
प्रेरक, तारक, मोचक तृष्णा.
हर्षाचा आदित्य दिसाचा
रात्रींचें अद्वैत-चांदणें
यांच्या मायेखाली फुलेल
प्राणवती प्रीतीची अनाश
आनंदाची रसाळ वेल.

# तृष्णेच्या कांठावर

माघाच्या उत्तरात्रीमधला
चांद मावळता.
गांव निजे, झांज कुठेतरि वाजे
मृदुंग तंबोरा.
'विठूचा गजर हरिनामाचा
झेंडा रोविला.'
ठाकला तहानेल्यांचा मेळा
पिसाट मैदानीं...
'वाळवंटीं चंद्रभागेच्या कांठीं
डाव मांडिला.'
चित्ताच्या सरोवरीं घे पिंगा
नौका स्वप्नाची.

खेळ तिचा चेववितो
खोल खोल डोहामधि
नागकुळें, नक्रकुळें
यक्षाच्या प्रश्नांचीं.

त्यांचा चीत्कार दडे
कैक जन्ममरणांतुन
अंध हाक उठवीते
उत्तरध्रुव – दक्षिणध्रुव !

गजर कशाला ओंगळ
अंगभरी डसवीतां ?
उरीं मस्तकीं झेंडे–
हीं धेंडें – नाचवितां ?
( भूतभविष्यीं ज्यांचें
सोयर ना सुतक अम्हां ! )

झेंड्यांतुन कां झरते
रक्ताची चटक धार ?
रक्तांतुन कां जळते
वैफल्याचीच आग ?
विफलतेंत कां लागे
जगण्याची प्यार भूक ?
जगतांना कां छळतें
मरणाचें कुटिल शल्य ?
निढळीच्या रांजणास
नकळत कां तडा पडे ?
श्रेयाचे मधुघट कां
हिरमुसून हो उपडे ?

तृष्णेच्या कांठावर
विरस, दग्ध वालुकेंत
मांडुनिया घडिभरचा
डाव अम्ही वांछितसों
विगतव्यथ, तृप्तकाम
मुक्त जीवनक्रीडा !

परि त्याची तीच कथा
तोच अंत :
तमसेच्या तीरावर
जानकिचें जें जीवन–
आशामय परि विकीर्ण,
सृजनोत्सुक परि विशीर्ण !
वाढवीत देवाच्या
बीजाचे नव अंकुर
मोजितसें प्रहर-पळें
धरणीच्या हाकेस्तव !

इकडे तर नियतीच्या
खोलकाळडोहामधि
फणफणतीं अमित कुळें
नागांचीं नक्रांचीं !

# सूत्रधार

नकारघंटा वाजे तिसरी...
नाटक बसलें – बसलें
पांचावरती धरून धारण
अडेलतट्टू !

मखमल नुसती चोळामोळा
झाली मांजरपाटासमान चिरगुट बोळा !
'अरगण' पडली
कण्हऽऽत कुंथत
मैद्याच्या कांद्याच्या जवळीं !
हवालदिल रसिकांची टोळी...

नाटचमंत्रि मी जरि हंगामी
खास दाविली उचापतींची
उठवळ गंमतजंमत !
शपथ वाहिली–
ईशं स्मरामि ।
सत्यं वदामि ।

ब्रीद तर छुपें–
                    व्रीडां जहामि ।
                    उदरं भरामि ।
कसून कमरेला पागोटें
सोंग पोतराजानें धरिलें
लीलानाटकसूत्रधराचें !

एकच धांदल :
तिरपिट, तिरिमिरि
घनचक्कर, धां-कट-कट-धि-गा
तोबातोबा !
गधडी पलटण कामास उभी
(या भूमीच्या) रंगपटावर करून उरलों
द्वादशांगुळें !

पी. वामन मास्तरास केलें
सर-दिग्दर्शक अन् संयोजक.
बापड्यास ज्या वाटे कायम
'रंगदेव मी, जड-भरतमुनी !'
महान् नटांना नव्हतें कमती
वामन पी.च्या घावांखाली
        ('टाकि'चेच ते !)
खरवड काढुन गणु न्हाव्याची
चापुन चोपुन त्यास बसविलें

इंद्रप्रस्थाच्या तख्तावर !
लफ्फ्याची नेसून पैठणी
जगन्नाथ पाणक्या चोंबडा
घेइ रूपडें रुक्मीणीचें !
जालंदर आचारी होई
मोरपिसें खोवून किरीटीं
राधाधरमधुमिलिंद माधव !
खंडोबा पेंटरास दिधली
शिशुपालाची चढेल नक्कल !
कधी कधी तर मी झालों अन्
तोही झाला
कलुषा कब्जी आणि शिखंडी !

रात्रीरात्रींतुन भयासुर आणिक छचोर
लीला दावित
चाळ बांधिले, टोप चढविले लाजिरवाणे
रंग माखुनी...
खेळ लाविला 'रामराज्य' अन्
थाटाचें नेपथ्य रचुन त्या
'भाउबंदकी'च्या फार्साचें
कळा दिली 'बेबंदशाहि'ची !

खेळ आमुच्या अंगीं लागे.
'मस्त ! वाहवा !' लोक म्हणाले.

चेवुन गेलों रचीत आम्ही
प्रयोग अभिनव...

जुनेच रस ते मधु, संजीवक
मात्र तयांचें करून मिश्रण
अचकट विचकट,
मुरवुन कुजवुन फेस भराभर
उसळून दिला रसायनाचा !
फक्कड मैफल बेहोषांची...

'ही वैऱ्याची रात्र करंटी !'
ज्याची त्याची उलटी कवटी
एकेकाच्या करीं नरोटी
देउन म्हणतों मी तर करीन
सूं पोबारा...

खलाऽऽस नाटक
उत्तररात्रीं !

# नवल वर्तलें

भिरंगटत नियतीच्या फेऱ्यांत
धांडोळत निवारा
उतरली वावडी
टकमक कड्याच्या टोकावरी.
सभोवार थाटली रंगसभा
बाटग्या उजेडाची;
अंतरीं जवनिका
मूढ अंधाराची.
हाय, हाय ! चित्रींच्या राजहंसें
गिळिला कंठा
खुंटीवरचा !

परि वर्तलें, नवल वर्तलें !
ज्ञानदेवाची गात गाथा
पार्थसख्याच्या सांगत कथा
अवचित कोण ठाकलें
सामोरें उभें
'दत्त' म्हणून ?

पाहतां पाहतां–
काजळ-माखल्या दिशांची
उजळली मुद्रा :
समुद्रांत सांध्य तेजाच्या
विरघळली निद्रा !

दीन अनुकंपा
कुटाळ सोबत
प्रीत बुजरी
स्नेहही अंगचोर–
येथली बाजारपेठ
व्यभिचारभावांची !
कुजबुज, बुजबुज, कोलाहल तिचा
टाकिला मागे.

आर्ष त्या कविलोचनीं
देखिले तरळ भाव, विरळ भाव, विमल भाव.
त्या मराळ–पंखांवरून
केल्या सिंदबादसफरी
सात सिंधूंवरी–
जे होते अनोळखी आजवेरी.
द्राविड त्या संगतींत
देखिलें प्रतिभेचें अथांग विलसित
शोधिलें क्षेममिठी देणारें बंदर
जनन‍ान्तर सख्याचें !

# नीरानरसिंह

दोन नद्यांच्या संगमभूवर
प्रतिष्ठापिलें कुणी एकदा
भीषणोग्र परि नित्य शुभंकर
विश्वनटाचें चौथें रूपक !
चहुबाजूंना हसरी धरणी
गर्भश्रीमान्, सुजला, सुफला
सस्यशामला...

"ही तर तुमची कविता झाली !
पहा महाशय, ढुंकुन इकडे
निःशब्द कसें गांवठाण तें—
गाइगुरांची, गावकऱ्यांची
या वस्तीला न् वास्तूलाही
सोडचिठ्ठि ही"

खरेंच कीं हो ! जिथे जागतो
चैतन्याचा केवळ गाभा,
तिथें जिवांना पडतें कोडें
भर रात्रीचें ऐन दुपारीं !

वर्षें गेलीं, तपें उलथलीं
उजाड झालीं घरटीं त्यांचीं.
उंबरठ्यावर दिवा न जळला,
तुळशीखाली कुठली पोथी ?
कुठली छाया दुडदुडणाऱ्या
बोबडणाऱ्या बाळपणाची ?
पडवीला दातखीळ बसली
सदाकदाची.

मग कुठुनी ऐकाल हो इथे
प्रल्हादकथा, भाविक भजनें ?
झांजतंबुरा भंगुन गेला,
झडे न टिपरी चौघड्यावरी
मध्यान्हाला, दिवसास्ताला !

सूर्य बुडाला...
खचून गेला दिस सोन्याचा क्षितिजाखाली.
झरझर उतरे काळी माया
भवती पिकल्या उभ्या मळ्यांवर.
दोहि नद्यांच्या काजळभरल्या पात्रांमधुनी
मुकेपणानें स्फुंदत जाई
विषण्णतेचें, भयानकाचें
उदास-निर्मळ पाणी-पाणी !

भकास, ओकें, सुनें वाटतें !
दिशादिशांतुन भणभण वारें
वैशाखाचें कण्हत गातसें—
कजाग, खुनशी, ऐदी, भेदी
जीवांच्या त्या जुन्या कहाण्या
भुताटकीच्या, शिदळकीच्या !

इथे जन्मतो दरसालाला
सखा कृपाळू भक्तजनांचा—
तारक प्रेमळ रौद्र भयान्तक :
हो, तर खरेंच !
जन्माला घालून तयाला
आम्ही मरतों दरदिवसाला :
मारक, अतिबीभत्स भयावह
अमचें जगणें क्षणाक्षणाला !

नरसिंहाच्या मांडीवरती
मरण्याचें तरि भाग्य लागतें !
नरसिंहाची पंचक्रोशी
सांडुन देशोधडी व्हावया
जन्मांतरिचें दैन्य पाठिशी
भुंकत असतें !

८७२८

# कसलें गाणें ?

कसलें गाणें ?
जुन्या सुरांनीं नव्या भरानें गासि कुणाचें गाणें ?
कधी सुखानें कधि दुःखानें गासि कशाचें गाणें ?

यौवन देहीं प्रत्यंगांतुन ललकारत येई
सामर्थ्याचा, सौंदर्याचा कानोसा घेई.
बद्ध जिण्याच्या विमोचनाची कांक्षा मनांत गाजे
रूपवतीच्या प्रणयाचीही पाउल-चाहुल लागे.
लालस-स्नेहल-पिंगट-काळ्या नेत्रींचीं प्रतिबिंबें
निरखित असतां, डोंब भडकला त्याची ज्वाला दिसे !
कवटाळुन बाहूंत सखीला चंद्रोदयसमयीं
सांगत असतां संकेताचे शब्द शाल्मलीखालीं
कजाग, भैरव भवितव्याची नौबत कानीं पडे...
तसेंच पाऊल पुढे टाकतां घुमलें रानींवनीं
समरगीत झुंजार देशचें, त्याची खिन्न कहाणी.
अंधुक सायंतनीं, गाढ तमलिप्त मध्यरात्रीं
वद्य चांदण्यांतून उमलत्या लाल उषःकाळीं

मनोनभावर सुंदर-समर्थ चित्रें रहस्यमय तीं
मयासुराच्या सृष्टिहूनही अद्‌भुत धरिती दीप्ती.
त्या चित्रांचें रूप माझिया मनांत वावरतें
त्या दीप्तीच्या नवलाईचीं गाणीं मी गातसें.

ओस अंगणीं वाट कधीची पाचोळुन पडते
ओसरीवरी जिवलग, सस्मित चाहुल लोपुन जाते.
उंबरठ्यांतुन दिवंगताची वाट पहावी का ?
वाट पाहुनी डोळे टिपणें वाया नाही का ?
राममंदिरीं टिपरी झडते, सनई उदास गाते
राईतुन मोराची व्याकुळ किकाळी उठते.
धुकें दाटतें बाहिर आंतहि, दहिवर उतरे नयनीं
विरहकळेची जनांत किंवा मनांत गातों गाणीं.

वसुंधरेच्या देहामधुनी उठतो मादक गंध
नवोन्मेषधारिणी दिसे ती सकाम रोमांचित.
वाऱ्यावर कधि घालि उखाणे फळाफुलांचा वास
कधि परदेशी कुण्या पाखराचें झडलेलें पीस.
निळ्या अंतराळांतुन झरते मधुर स्वरवाहिनी
क्षितिजामागे तेज फाकतें शीतल, चंदेरी.
प्रकाशकिरणें चंचल श्यामल जळांत कंपित होतां
पाउसवारा झाडांमधुनी सपसप दौडत जातां,
आतुर हृदयीं अबोध संवेदन दर्वळुनी उठतें
नि:शब्दाच्या सारंगीवर कविता झंकृत होते.

# वाटतें विचारावें

गारद झालीं युगामागें युगें :
दास्य जिवंत जागें
करून दिवसाची रात्र
गस्त घालिते अवती भवती !
त्या दास्यांत चिघळल्या जखमांनीं
दीनपणें अजून किंकाळणाऱ्या,
परि मिळतांच उसंत
हसून उसनें,
आगंतुक दिमाखानें
संस्कृतिपाठ जगतास देणाऱ्या
प्राचीन देशांतल्या
बजबजपुरीच्या हमरस्त्यावरील
भणंग मी...
दस लाखांचा नायक एक !

बघा पुरतें त्याहळून
माझ्या डोळ्यांचें मीठ-पाणी
ओठींचें कारलें कडू

उन्हाळा मस्तकींचा
करचरणींचा हिवाळा !
पुसा कोण्या जाणत्यांना
माझ्या ललाटींच्या भाग्यरेषा.

म्हणतील कोणी–
अकिंचनत्वानें
यास केलें बापुडवाणें;
शय्यासखीविना
निर्माल्य झालें जीवफुलाचें;
प्रियजनांच्या महाप्रयाणानें
शून्य झाल्या दिशा याच्या;
भवबंधांतून पैदासल्या
समंधाच्या हैदोसानें
ढासळलें आकाश...
चूर झाला हा.

असें ना तसें,
खरें खोटें तेंच खोटें खरें.
सत्य इतकेंच कीं
अनेक द्वंद्वांतून
मर्मभेदांतून
शेष उरलों माझा मीच
हारजीत अवघी कोळून !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम १८८०३ नि. ८/०५ —
क्रमांक ९३२७९ नों. दि. २९/३/५८

परि वाटतें–
एवढें त्रुटित आणि खंडित
विद्ध आणि कुरूप
कां असावें जीवन माझें ?
रोमरोमीं त्याचिया
रुजली अपूर्णता;
भिनला दाहक विखार
जन्मांतरींच्या पार्थिव नतद्रष्टतेचा
आणि अतर्क्य दैवी पीडेचा !
त्यांनीं निर्मिलेल्या
गाढ विषादांत,
उन्मादक तिरीमिरींत
फोफावत आहे जिण्याची व्यर्थता
– सार्थता !
रूप घेत आहे तेजोभग्न पुरूषार्थ.

वाटतें विचारावें :
असुंदराच्या गवसणींत
गुदमरून सुंदरास,
अमंगळाचें रोगण
फासफासून मंगळास,
अनीप्सित मूढतेचे
आणि करंट्या कर्तव्याचे

हिजडे पैंजण पायीं बांधून,
कोणाच्या विनोदनार्थ
कोणाच्या डोळ्यांचें पारणें फिटाया,
जगताच्या या
लुप्तहर्ष रंगभूमीवर
कोण नाचवीत आहे आम्हांस ?

# रूप पाहतां दर्पणीं

दर्पणींचें रूप तुझें
त्या दिनान्तीच्या सौम्य तेजांत
ओझरतें देखिलें.

निमिषभर जागीं थबकलों
आणि डोळ्यांच्या अंतर्भागांत
रेखून ठेविली
आकृती तुझी :
टिपून घेतलें
अंग-अंग तुझें.
काळजाच्या रिकाम्या ओंजळींत
ओतलास केशर-कस्तुरीचा मद-गंध,
सुमरसाचा मधुरिमा.

बाळपणींची याद ये मज.
देवळांतल्या उंबराखाली
बकुळीखाली
आंधळी कोशिंबीर खेळणाऱ्या

मित्रमैत्रिणी.
रुसवा फुगवा, चावेचिमटे,
त्यांच्या मिठ्या
त्यांचें कुरवाळणें,
संगतीनें बोलणें-हसणें
गाणें-किंचाळणें.
त्या सुकुमार परिवारांत
होती एक सावळी सखी
तरतरीत नाकडोळ्यांची
लाल जिवणीची :
हनुवटीवर तिच्या होता
तुरी एवढा हिरवा गोंद.

तुझिया कंठावरचा
तीळ काळा पाहून
सय आली मला
त्या गोंदल्या हनुवटीची.

...नंतर मावळल्या
किती एक दिवसरात्री,
चैत्र-वैशाख पाठमोरे झाले;
दैवगतीनें जीवनानें
घेतले वेगळे वळसे
धरिलें नवें रूप

अनपेक्ष आणि गतव्यथ.
नव्हती उदासीनता
हृदयास पुरती झोंबली.

परवा
अस्तमानाच्या, गूढ दंश घेणाऱ्या
स्तब्ध समयीं–
शिणला-भागला
उभा मी आरशापुढे.
उलथा पसा पालथा घातल्या दिवसाची
घामट धूळ
पाहिली माखलेली
सर्वांगभरी.

नित्याचाच तो बेढब देखावा !
परि कां न कळे
ओठांवर आल्या त्या सायंतनीं
ज्ञानियाच्या अभंग-ओळी :
"रूप पाहतां लोचनीं
सुख जालें वो साजणी"

आणि, किमयांकित त्या शब्दांमागून
भुयारांत नेणिवेच्या
गाढ ग्लानींत बेहोष पडलेल्या

कांहीं जिवलग स्मृती
भूतकाळच्या अनुभूती
जिवंत वारा प्याया जाणिवेचा
तळमळत ठेचाळत आल्या
उन्निद्र उराच्या उंबऱ्याशी !

अस्तास गेला... गेला...
सांजवेळ कोंदटून आली
समोरील पडछायेची
पुसत चालली...चालली
रूपरेषा.

गळीं घालून गळा
देऊन चिमण्या हातमिठचा
नाचलों जिच्यासह बाळपणीं
ती गोंदल्या हनुवटीची
पोर सावळी...

रूपसामर्थ्य माझें
तुझ्या रसमयी प्रीतीचें
लेववून ऐश्वर्य-लेणें
अप्रूपानें शृंगारणारी
उदार सखी तूं...

आणि–
जीवकळेची जिच्या पूर्णिमा
माझ्या देखत-देखत
किर अवसेनें ग्रासिली,
जीवनान्तीं या
ढाळावीं आसवें जिनें–
चंद्रलेखा ती लोपली अकस्मात्...
नवल झालें, विपरीत केवळ :
'वळचणीचें पाणी आढ्या गेलें !'

तीघीजणी
आपापल्या परींनीं
कशास तरी
– कशास नेणें–
पारखा करून गेलां मला.

लोचनांच्या डहुळत्या जळांतून
तीनसांजेच्या चढत्या काळोखांत
आरशांत मीं
काय पाहिलें ?
कुणाचीं, कसलीं रूपें ?
सुख कसलें, साजणी,
झालें मला ?

# तूं

असंयुक्त प्रीतीला
विस्कटून पीडिलेंस :
प्रेमहीन गुंत्याचे
वाभाडे दाविलेस !

निर्जीवन मेघांवर
रंगहास्य उधळिलेंस :
रसरसत्या जिव्हाळ्यास
अहोरात्र रडविलेंस !

पुनवेच्या रात्रीला
ग्रहणाचा शाप दिला :
ग्रहणाच्या प्रहरांना
पर्वाचा वर दिधला !

# मी

मी रुद्राक्षांचा
लिलाव फुंकुन उठलों :
माडीवरच्या विळख्यामधल्या
विड्यांत रंगुन पिचलों !

मी गाथा बुडवुन
लाथा चुरीत बसलों :
चोखोबांच्या अस्थींवरती
भेद-पुराणीं रमलों !

मी वसा घेउनी
उतून मातुन गेलों :
फल्गुनदीच्या तीरावरल्या
शितांभोवती जगलों !

मी पानिपताचीं
कैक उरकिलीं श्राद्धें :
हिरोशिमाच्या उरीं नाचवित
वेताळांचे तांडे !

मी अणू फोडुनी
अनंत पीडा रचिली :
पृथ्वीवरची भित्री शांती
धुस-फुसलावुन नेली !

मी कपाळावरी
अभद्र जखमा ल्यालों :
द्रोणपुत्र होऊन चिरंतन
शापित वणवण फिरलों !

चिरंजीव मी !

# हेंचि दान दे गा

मृत्युलोकींचीं सुखें
नव्यानें भोगाया
चाललों, ईश्वरा,
पुन्हा गर्भवासीं–
बलीयसी तुझी इच्छा !

अनंत सोहळ्यांची
जन्मांतरांतून चाखीत मजा
आयास केला अकटोविकटो
मिजासीनें जगण्याचा;
आणि जाणतां वा अजाणतां
कधी देहानें, कधी मनानें
होऊन अपंग
जेर झालों, गळचेपलों.
उदारांच्या राजा,
भिक्षेची म्हणून आज याचना.

सालोसाल दंगली-युद्धांतून
सर्वकाळ ठिकाणीं राहणारें
शाबूत डोकें दे मला, देवा.

हिंसा, अपघात, मृत्यु
पावलोपावलीं–
ओसाडी शेतमळ्यांची,
विध्वंस नांदत्या नगरांचा,
पारध-होळी माणसांची,
न पाहिल्यागत करणारी
निराग्रही डोळ्यांची
स्वच्छ, काळीभोर जोडी दे मला.

विसंवादी सुरांच्या
दीन, बीभत्स, कर्कश नादांच्या
मूर्ख, नीच, फसव्या बोलांच्या
जटिलांतील जादूनें राक्षसी
न वेडे होतील बापडे
असे दे मला, देवा,
बेरकी कान दोन.

गुच्छ-झेले दुर्गंधाचे
आणि सर्वांगमिठी देणारा
बुक्का-गुलाल धुळीचा,

यांचें जागरूक प्रणयानें
आतिथ्य करणारें
सरळ, उभें नाक दे मला.

प्रसंगीं मनसोक्त आणि मन:पूत बोलणारें
एरवी चिडीचीप बसणारें
तोंडही एक हवें...

एवढ्यांत किती जांभया दिल्यास
देवाधिदेवा !
निम्मीशिम्मीच ऐकिलीस
माझी भिक्षां देहि.
मोठ्या हुल्लडीनें
फिरून जन्मा घातल्या
भाग्यवंत जीवाची किरकिर
अपुरीच नकोस दवडूं कानांआड.
ऐक पुढती, दयाळा,
माझी भिक्षावळ लेकुरवाळी.

मतलबी प्रीती
तोंडदेखली मैत्री
पाठींतला घाव
विहिरीवरचें, परावरचें पिशाच्च
यांना सर्फ झकविणारें
आणि झकवून हासणारें
दे मला मन धट्टेकट्टें.

सुखदु:खांच्या उदयास्तांच्या
पलीकडे विलसते चांदणी
आनंदाची.
शांत तिच्या तेजानें प्रसन्न
सिंचित, पुलकित
आणिक अंकित व्हावें मानस.

त्या मायावी लोकांतल्या
अजाण आयांचीं मनें
आहेत रे नाठाळ, नतद्रष्ट, खुरटीं.
अदूरदर्शी बापांचीं
आहेत शिळीं-खरकटीं.
अहंमन्य गुरूजींची
आहेत ठोंबीं, समंधी.
वैरी आप्तांचीं आहेत रे
धटिंगण, कारस्थानी.
बुद्धिशून्यांचीं–
फिरलेलीं, सोकलेलीं, भकास.
आणि अतिबुद्धिमंतांचीं–
रुग्ण, गुंताडलेलीं, गिचमिड.
ऐतखाऊ गलेलठ्ठांचीं
आहेत रे मनें
सडकीं, महारोगी.
गुलामीनें कातावल्या पोटसेवकांची

आहेत झिजलेलीं, थिजलेलीं.
अतिश्रमानें आंबलेल्या,
सुकलेल्या कामकऱ्यांचीं
नव्या दंशानें झिणझिणणारीं
गैरसावध मनें
आहेत हिकमत्यांनीं वेसणलेलीं...
हीं सगळीं मिळून, देवाधिदेवा,
झोळींत माझ्या नसेल तुझी भिक्षा
तर टाकितील पुन्हा एकदा
गळफासून जिवंतपणीं.

म्हणून, करुणेच्या सागरा,
चौपदरींत टाक माझ्या
घास चार तुझ्या अपार दयेचे !

हेंचि दान दे गा तुझा–
माझा विसर न व्हावा;
तुक्यासंगें गर्भवासीं
सुखें घालावें आम्हांसी !

# आठवण

ती आठवते मज श्रावणसायंकाळ...
वारा-पाउस नाचुन गेला खिदळत रानोमाळ
मावळतीहुन विवळत आला तांबुस-पिवळा झोत
अंगणांतल्या डाळिंबावर लाल कळ्यांचा तोर.

ती श्रावणांतली हसरी सायंकाळ...
शाळेंतुन आलीस घराला नाचत-डोलत-गात
पुस्तक-पाटी फेंकुन तशीच गुंगत गेलिस आंत;
ठिबकत होते केस, मुखावर हसूआसूंचा खेळ
ओठांवरचें गाणें केवळ होय-नव्हेचा मेळ.
नकळत कळली होती तुजला जीवनमरणाची झोंबी
टिळकांची 'पक्षीण' गात गे, होती तुझिया कंठीं.

आज कोठल्या कोठे आलों ! उजाड पसरे माळ
अश्रुमलिन ही हळवी सायंकाळ...
खिदळत जातो श्रावणवारा, सडसड येते धार
निळ्या ब्रह्मकमळावर झळके तांबुस-पिवळी झार

आज परी तूं नाहिस, अवचित तुटून गेली तार
बाळपणींच्या मनोरथांपरि हरवुन बसलों पार.
पाळण्यांतले दिलेस झोके, दिलेस चिमणे घास
उरला माझ्याभवती केवळ आठवणीचा फास !
ही श्रावणांतील सायंकाळ उदास...

# निवान्त

निवान्त होतों बसलों आपण
जमीन होती नांगरलेली.
जवळच अरणीवरचा आंबा
पाडा येउन लवला होता.

हिरवी तांबुस झांक सुनेरी
रेखित होती मनांत रेषा
हिरव्या-कच्च्या...
कोरित होता रसाल गाभा
तिरपा कप्पा !

सारस बागेमधील घंटा
उठवित होती स्वप्न उद्यांचें
नव-रात्रीचें...
...आणिक जवळच
फांदीवरूनी घालित होता
खवट उखाणा
डोमकावळा !

तरीहि बसलों निवान्त आपण
लुटूपुटीच्या बोलत गोष्टी.
भानच नुरलें पुढील-मागिल
त्या प्रहराला दुःखीकष्टी !

# असशील कुठे ?

मधुमासाचा दिन ओसरला, मावळलें ऊन
झुळुक अडखळे, कुहूकुहूही थबके तरूवरून;
राईमधल्या देवळांतली घुमे चौघडा-सनई
नाचतसे उल्हास शरीरीं आणि लालसा मनीं.

या अबोध, सुंदर, श्यामल संध्यासमयीं
संगतीं कुणाच्या असशिल माझ्या सखे ?

आकाशांतुन धारा रिपरिप संतत कोसळती
मेघांमधली चपल नर्तिका प्रकाशनृत्य करी;
पलाश, पिंपळ, निंब नि केळी चिंब ! – स्वैर वारें
कानीं येतो घू-घू स्वर हा थरकत कुठुनि बरें ?

या जलार्द्र, भयकर दिवेलागणी-समयीं
बिलगुनी कुणाला असशिल माझ्या सखे ?

आश्विन : वर्षामेघ पांगले दिशादिशांतून
फिक्कट निळसर नभीं दाटलें चांद्रमसी तेज;
अर्जुनवृक्षीं अर्धोन्मीलित लाख कळ्यांचे देठ
कसलें माझ्या मनीं तरळतें एकलकोंडें गीत ?

या नीरव, सौरभशाली निशीथसमयीं
रंजनीं कुणाच्या सुखावलिस तूं सखे ?

किर्र दाट काळोख: चांदण्या हसति अंतराळीं
पायघड्या घालीत वायुवर निघे रातराणी;
संथ नदी, निःशब्द पाखरें, दहिवर ठिबकूं लागे–
पुलाकांठच्या प्रासादामधि कोण अजुनि जागें ?

या मध्यरात्रिच्या हिमकंपित समयीं
बाहूंत कुणाच्या विसावलिस तूं सखे ?

अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि:

# अजून इथे

अजून इथे रात्र आहे
अजून इथे जत्रा आहे :

नंगेपणांत दंग व्हा
सोंगांमधून ढोंगें भरा–

अजून रात्र गडद आहे
अजून जत्रा झिंगत आहे !

अजून इथे तेल आहे
अजून मशाल जळते आहे :

पेठच्या पेठ खालून पेटवा
उलटचा बोंबा वरून ठोका–

अजून तेल बक्कळ आहे
ढणढण मशाल खवखवत आहे !

अजून इथे थंडी आहे
अजून बर्फ पिकतो आहे :

कंडी पिटून हंडी शिजवा
खांचांमधून खोकीं निजवा–

अजून अंगांत थंडी आहे
बर्फांत समंध जिता आहे !

अजून इथे नशा आहे
दिशादिशांत विखार आहे :

फंद फळवा आळोआळीं
पेरा फितूर जळींस्थळीं–

अजून नशा गगनग्रासी
अजून उषा गर्भवासी !

# राजहंसानो

कडवट जिभेनें गायिलेल्या
वस्स झाल्या हळव्या कथा
मुस्कटदाबीच्या
वदकिस्मतीच्या.

गाऊं या एक मोकळें गाणें
स्वैर उल्हासाचें,
पोटांतल्या गोष्टींचें
स्वच्छ, उघडें
मनांतलें मागणें.
जातील त्याच्या लकेरी
निळ्या अस्मानांतून
हिरव्या रानांवरून
धुरकटल्या नगरांत
दारोदार, कोनाकोनीं ...
आणि नाचेल हृदयाहृदयांत
अननुभूतसें परीनृत्य.

आपापल्या निर्व्याज आसक्तीचा
निर्मळ अभिलाषेचा
पुऱ्या आणि अपुऱ्या वांछितांचा
जमवूं या सुंदर वाद्यमेळ
त्या परीनृत्याभोवती.
थांबवूं नाटकी हसें-रडें,
मस्तकांतलीं झाडून किल्मिषें
उतरूं संकोचाचे बटबटीत शिणगार.
फेडून संदेहाचीं कळकट वस्त्रें
काळेबेरे फोडूं चष्मे;
बोट लावून अद्भुत अंजनाचें,
माखून यक्षकर्दमाची उटी
आळवूं या अभिजात रागरागिणी !

जिवंत रसरशीत हातापायांना,
जातिवंत मेंदूला
दिवसाचें काम अंगभर हवें
खपावयाला क्षेत्र आवडीचें
घाम शिंपावया.
खातें आंतल्या आंत
जीवास याविना.
असेंच ना ?
कां चाचरतां ?
जमवून सुंदर वाद्यमेळ

गाऊं या उंच स्वरानें
जीविताचें वेधक गाणें !

टळटळीत दुपारीं,
भरल्या सांजेला,
भाजीभाकरीचे, दहीकाल्याचे
-सणावारीं तूपसाखरेचे-
घास हवे पोटभर, घरमंडळींना.
उणेपणा खोल सलतो
आमुच्या जीवा.
असेंच ना ?
म्हणूं या तसें.
गाऊं या उंच स्वरानें
जीविताचें वेधक गाणें, भेदक गाणें !

पेटलेला पोत मन्मथाचा
जळतो आपुल्या मानसीं :
उत्तेजक स्नेहाभावीं
चुटपुटतो, चडफडतो.
होय ना ? म्हणूं या तसें.
कशाचे शरमिंधे आम्ही ?
सर्वत्र हीच अनवस्था-
अनिवार लालसा
प्रियदर्शनाची, प्रियमीलनाची.

आंब्याखाली, निंबाखाली
बकुळीखाली, बाभळीखाली
मातींत काळ्या
गवतांत हिरव्या-पिवळ्या
निसटत्या पारदर्शक उन्हांत
निळसर विरळ धुक्यांत
वाळूच्या खिजवत्या शेजेवर
पिकल्या मळ्याच्या सुगंधांत
निगनिगत्या शेकोटीभवती
विरागी संधिप्रकाशांत
नक्षत्रांच्या मंद वंचक तेजांत
वा अनुरक्त चांदण्यांत,
जिवलग सखीसंगती
खोडसाळ सख्यासमवेत
कराव्या जिव्हारींच्या कानगोष्टी–
हो-नकोच्या चुकार देवघेवी,
संगमोत्सुक विविध क्रीडा :
हें, हेंच अगदी तुमच्या मनांतलें
आणि तुमच्या तिच्याहि !
म्हणूं या तसें.
निःशंक रचूं या कविता
नसो ती जुनी किंवा नवीहि !
जमवून सुंदर वाद्यमेळ
गाऊं या उंच स्वरानें

जीविताचें वेधक गाणें, भेदक गाणें, दाहक गाणें !
पडसादहि ऐकतां ज्याचे
पडावा चिरा
दांभिकांच्या, भेकडांच्या
ओंगळ कोलाहला.

ओठांवरचे तवंग फसवे
काढून निपटून,
जिभेच्या मुळाशी, खोल खालती
भरलें जेंजें पोटांत साठलें—
करूं या त्याचें मधुर गाणें
मोकळ्या गळ्यांतून उन्मळणारें...
'त्यास हवें जित्या जिवाचें
जातिवंत जगणें !'

अनोळखी राजहंसांनो,
अंतरात्मा तुमचा
माझ्या ओळखीचा, ऋणानुबंधी :
सुखदु:खाचे संवाद गातो
तुम्हांस नकळत तो
माझिया संवेदनेवरी.

# जाग

अशाच एक कलत्या रात्रीं
चुंबुन गेली जाग :

आणि वाटलें–
व्यासमुनींच्या मांडीखाली
मृगचर्म कधी
होतां येइल काय ?
कधीतरि होतां येइल काय ?

आणि वाटलें–
कविकुलगुरूच्या
खांद्यांवर रुळणारा शेला
होतां येइल काय ?
कधीतरि होतां येइल काय ?

आणि वाटलें–
ज्ञानदेवमस्तकीं
होउन एक जटा कुरळी
झुलतां येइल काय ?
कधीतरि झुलतां येइल काय ?

अनुक्रम ... नि: ...
क्रमांक 7329 नोंः दिः 26/5/59

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३८ | ११ | स्मरणा | स्मरण |
| ४० | १ | उत्तरात्री | उत्तररात्री |
| ४२ | १८ | खोलकाळडोहामधि | खोल काळडोहामधि |
| ५० | १३ | मध्यान्हाला | मध्यान्हाला |
| ६९ | १२ | गुरूजींचीं | गुरुजींचीं |
| ६९ | १३ | ठोबीं | ठोंबीं |
| ७० | ४ | झिणझणणारीं | झिणझिणणारीं |
| ७३ | १४ | फांदीवरूनी | फांदीवरुनी |
| ७७ | १० | वरून | वरुन |
| ७९ | शीर्षक | राजहंसानो | राजहंसांनो |
| ८४ | १ | एक | एका |

REFBK-0008728
REFBK-0008728